# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०६/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### नैसर्गिक विज पडुन मृत्यू

**पो.स्टे. बोरी :—** अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा खेरी कलार शिवार ता. उमरेड जि. नागपुर येथे दिनांक २०/०६/२०२२ चे २०:३० वा. ते २१.०० वा. सुमारास **रामकिशन तुमला बारस्कर(मृतक), वय ६० वर्ष, रा. दामजीपुरा ता. भेजदई जि. बेतुल ह.मु. पिटर फ्रासींस उरकुडे यांचे शेताता** हे शौचास शेतात गेले असता अचानक नैसर्गिक विज अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— तुलसीराम विश्राम सावलकर, वय २२ वर्ष, रा. भिमधा पो.स्टे आसुर जि. खंडवा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार धवराळ मो नं ९७६५४९७००५ हे करीत आहे.

**पो.स्टे. उमरेड:—** अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा लोहारा शिवार येथे दि २१/६/२२ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान पराटी पेरन्याकरीता १३ महिला शेतात काम करित होते. तेव्हा अंदाजे १४/३० वा. दरम्यान अचानक खुप वादळ सुरु होउन विज चमकुन मुसळधार पाउस झाला. तेव्हा फिर्यादीचे शेतात काम करित असनारा मजुर मधील १. **उषा विरेन्द्र मांढककर (मृतक), वय ५० वर्ष रा दत्त मंदरी ईतवारपेठ उमरेड** २. सुहानी भटट वय १६ वर्ष रा पावनधाम उमरेड ३. रेनुका विजय हत्तीमारे रा. मंगळवारपेठ उमरेड या तीघीही एका झाडाखली थांबल्या तेव्हा विजेच्या धक्कयाने त्या बेशुदध पडल्या. त्यांना उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय उमरेड येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन सौ उषा विरेन्द्र मांढककर वय ५० वर्ष रा दत्तमंदीर ईतवारपेठ उमरेड यांना तपासुन मृत घोषीत केले व जखमी १. सुहानी भटट वय १६ वर्ष रा पावनधाम उमरेड ३. रेनुका विजय हत्तीमारे रा. मंगळवारपेठ उमरेड यांना नागपुर येथे दवाखन्यात रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संदीप गजानन मांडवकर, वय ३२ वर्ष, रा. कळमना यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अजितसांग ठाकुर मो नं ९४२३६००५५६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**